**सेतू मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना दयावयाच्या मानधनातील वाढीबाबतच्या मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग
शासन निर्णय : क्रमांक: कंत्राटी-२०१३/प्र.क्र. २/मग्रारो-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १ जून २०१३.

**वाचा**:- १) नियोजन विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र. ७/रोहयो - १० अ, दि. १६.१२.२०१०.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- कंत्राटी-२०१२/प्र.क्र. २७/मग्रारो-३, दि. २१.८.२०१२.

**प्रस्तावना**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा परिषदेला मनुष्यबळ (तांत्रिक पॅनेलसह) बाहयस्थ पध्दतीने उपलब्ध करुन देण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिनांक १६.१२.२०१० च्या शासन परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीरितीने करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिल कार्यालय व पंचायत समिती कार्यालय या ठिकाणी बाहयस्थ पध्दतीने विविध पदांवर कंत्राटी तत्त्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून, विविध संस्थामार्फत एकत्रित स्वरुपात मानधन देण्यात येत आहे. या कंत्राटी कर्मचा-यांना दिनांक २१.८.२०१२ च्या शासन निर्णयान्वये प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. आता ज्या कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित जिल्हयात बाहयस्थ पध्दतीने नियुक्त्या देण्यात आल्या आहेत, त्यांच्या मानधनात दिनांक १.४.२०१३ पासून सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात कार्यकारी समिती, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्य निधी असोसिएशन-महाराष्ट्र यांच्या दिनांक २५.३.२०१३ रोजी झालेल्या ७ व्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन, त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत संबंधित जिल्हयात सेतू या संस्थेमार्फत कंत्राटी तत्त्वावर नियुक्त्या करण्यात आलेल्या ज्या कंत्राटी कर्मचा-यांची सेवा दिनांक ३१.३.२०१३ रोजी एक वर्ष पूर्ण झालेली आहे, अशा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, एमआयएस को-ऑर्डिनेटर व क्लार्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या मानधनात पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्याचे पद | दि. १६.१२.२०१० च्या शासन परिपत्रकानुसार व दि. २१.८.२०१२ च्या शा.नि. तील तरतुदीनुसार मानधन | दिनांक १.४.२०१३ पासून मानधनाचे सुधारीत दर |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी | दि. १६.१२.२०१० च्या शासन परिपत्रकानुसार प्रतिमाह मानधन रु. १०,००० + रु. १,००० प्रवासखर्च व मोबाईल फोन खर्च अशी एकत्रित रक्कम अदा करण्यात येत होती. मात्र दिनांक २१.८.२०१२ च्या शा.नि.तील तरतुदीनुसार प्रवास खर्चाची तरतूद रद्द करण्यात आली आहे. | प्रतिमाह मानधन रु. ११,०००/- |
| २ | तांत्रिक अधिकारी | दि. १६.१२.२०१० च्या शासन परिपत्रकानुसार प्रतिमाह रु. ९,००० + रु. १,००० प्रवासखर्च व मोबाईल फोन खर्च अशी एकत्रित रक्कम अदा | प्रतिमाह मानधन रु. १०,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करण्यात येत होती. मात्र दिनांक २१.८.२०१२ च्या शा.नि.तील तरतुदीनुसार प्रवास खर्चाची तरतूद रद्द करण्यात आली आहे. | |
| ३ | एमआयएस को-ऑर्डिनेटर | संबंधित जिल्हयातील सेतू व तत्सम संस्थेने ठरविलेले मानधन | संबंधित जिल्हयातील सेतू व तत्सम संस्थेने ठरविलेल्या मानधनाव्यतिरीक्त प्रतिमाह रु. १०००/- इतकी मानधनात सुधारणा |
| ४ | क्लार्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर | संबंधित जिल्हयातील सेतू व तत्सम संस्थेने ठरविलेले मानधन | संबंधित जिल्हयातील सेतू व तत्सम संस्थेने ठरविलेल्या मानधनाव्यतिरीक्त प्रतिमाह रु. १०००/- इतकी मानधनात सुधारणा |

२. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (संनियंत्रण), सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (समन्वय) व तांत्रिक अधिकारी यांच्याकरीता विभागाच्या दिनांक १६.१२.२०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार मोबाईल फोन खर्चासाठी कमाल रुपये ३००/- प्रती महिना अशी अनुज्ञेय कण्यात आलेल्या रक्कमेची तरतूद कायम राहिल.

३. सेतू व तत्सम या संस्थेमार्फत संबंधित कार्यालयांनी कंत्राटी तत्त्वावर नियुक्त केलेल्या सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक अधिकारी, एमआयएस को-ऑर्डिनेटर व क्लार्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या मानधनात दिनांक १.४.२०१३ पासून सुधारणा करण्यात आल्याने, त्याप्रमाणे फरकाची रक्कम संबंधित कार्यालयांनी त्यांच्या माहे मे, २०१३ च्या मानधनासोबत अदा करावी. सदर मानधनाची रक्कम संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयांनी सेतू अथवा तत्सम बाहयस्थ संस्थांना उपलब्ध करुन द्यावी. तद्नंतर सेतू अथवा तत्सम बाहयस्थ संस्था त्यांच्यामार्फत बाहयस्थ पध्दतीने नियुक्त्या करण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना मानधनाच्या रकमेचे वाटप करतील.

४. प्रस्तुत प्रयोजनाकरिता होणारा खर्च, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय खर्चाकरिता अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून भागविण्यात यावा.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

1/6/2013

**(आर. विमला )**
उप सचिव (रोहयो)

प्रति,
आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र, नागपूर.
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
सर्व उपायुक्त (मग्रारोहयो).
सर्व उपजिल्हाधिकारी (मग्रारोहयो).
प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र – १ व २, मुंबई व नागपूर.
प्रधान महालेखापाल (लेखापरिक्षा) , महाराष्ट्र – १ व २, मुंबई व नागपूर.
संचालक (लेखा व कोषागारे), मुंबई.
सर्व सहसंचालक, लेखा व कोषागारे.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/ संशोधन अधिकारी, नियोजन विभाग (मग्रारोहयो), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
कार्यासन मग्रारोहयो-१, नियोजन विभाग (मग्रारोहयो), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२ (सारग्रंथासाठी).
निवड नस्ती, मग्रारो-३, नियोजन विभाग (मग्रारोहयो), मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.